**सं.फौ.ख.क्र. ४५६/२०१३**
शासन वि. दयानंद
**निशाणी क्र. १७**

***अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा पुरावा***

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की —

**माझे नांव** : सुभाष नरहरी महाजन ,
**वय** : ६२ वर्षे, **धंदा : सेवानिवृत्त**,
**राहणार** : हडपसर, जि.पुणे.

**सरतपासणी —अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. कदमः**

**१.** सन २०१२ मध्ये मी शिक्रापुर पोलिस ठाणे येथे सहा. पोलिस उपनिरीक्षक म्हणुन कार्यरत होतो. दिनांक १६/११/२०१२ रोजी मी ठाणे अंमलदार म्हणुन कार्यरत असताना खबरी दयानंद रमेश वाबळे टेम्पो चालक हजर होवुन त्याने खबर दिली. त्याप्रमाणे मी त्याची खबर नोंदवून घेतली. आता मला ती खबर दाखविली. त्यावर माझी व दयानंद रमेश वाबळे ची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदरची **खबर निशाणी १८** वर आहे. सदरच्या खबर प्रमाणे मी मोटार अपघात नोंद क्रमांक १५१/२०१२ नोंदविला व चौकशी माझ्याकडे घेतली.

**२.** चौकशी दरम्यान मी घटनास्थळाला भेट देवुन दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. आता मला घटनास्थळाचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनामा अगोदरच निशाणी १५ वर आहे. जखमींचे जबाब नोंदविले. मी आरोपीला मोटार कायदा कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली होती. आता मला ती नोटीस दाखविली. ती नोटीस तिच असुन त्यावर माझी व आरोपीची सही आहे. मजकुर खरा व बरोबर आहे. सदरची **नोटीस निशाणी १९** वर आहे. चौकशी दरम्यान मी जखमींचे प्रमाणपत्र हस्तगत केले. माझ्या चौकशीमध्ये निष्पन्न झाले की, आरोपी दयानंद वाबळे यांनी त्याच्या ताब्यातील टेम्पो क्रमांक एम.एच.०४ ७५०४ हा वाहतुकीच्या नियमाकडे दुर्लक्ष करून मोटार सायकल क्रमांक एम.एच.१२एफ.एस.३००१ च्या चालकाला धडक दिली आणि त्याच्या जखमीस कारणीभुत ठरला म्हणुन मी फिर्याद दाखल केली. आता मला ती फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर

आहे. **फिर्याद निशाणी २०** वर आहे.

**३.** सदरच्या फिर्याद प्रमाणे गुन्हा क्रमांक ३०२/२०१२ नोंदविण्यात आला व तोंडी आदेशान्वये तपास माझ्याकडे आला. मी तपास करून आरोपीविरूध्द सबळ पुरावा आला म्हणुन दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला ओळखु शकतो. आज आरोपी न्यायालयासमक्ष हजर नाहीत.

**४.** मी साक्षीदार सीताराम नवलेचा जबाब त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता. त्याच्या जबाबातील रेखांकीत भाग अ मधील मजकुर त्यांनी मला सांगितला होता. सदरचा **रेखांकीत भाग अ मधील मजकुर निशाणी २१** वर आहे.

<u>उलटतपास</u>: <u>आरोपी तर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. एस. आर. शिंदे:</u>

**५.** आरोपीचा पुकारा केला असता आरोपी गैरहजर. श्री. एस.आर.शिंदे विधीज्ञ न्यायालयासमक्ष हजर. श्री. एस.आर.शिंदे यांनी न्यायालयास सांगितले की, आरोपी हा त्यांना माहिती देत नसल्यामुळे ते सदरचा खटला चालवु शकत नाही. म्हणुन **उलटतपास काही नाही. फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
2026.04.27 17:51:56 +0530

**(एस. डी. वानखेडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी, ता. शिरूर, जि. पुणे

ठिकाण : २७/०४/२०२६.

सं.फौ.ख.क्र. ४५६/२०१३
शासन वि. दयानंद
निशाणी क्र. १७